प्रमाणपत्र

प्रस्तुत प्रबंधात श्री. मधुकर बाबूराव अनंतकवळस यांनी "शेती विकासासाठी सहकारी पतपुरवठा माढा तालुक्याचा ( जि. सोलापूर ) अभ्यास " याचा अभ्यास केला आहे. त्यानी हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. तो यापूर्वी कोणत्याही विदयापीठीय स्तरावर पदवी मिळविण्यासाठी उपयोगात आणलेला नाही.

ठिकाण : अर्जुननगर.

दिनांक : १/८/१९८९

Vkashalkar

( डॉ. सौ. व्ही. एम्. कशाळीकर )
संशोधन मार्गदर्शिका.

## प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की हा संशोधन प्रबंध " शेती विकासासाठी सहकारी पतपुरवठा माढा तालुक्याचा ( जि. सोलापूर ) अभ्यास " मी स्वत: संशोधित केला असून या पूर्वी हा कोणत्याही विदयापीठीय स्तरावर कोणतीही पदवी वा पदवीका मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेला नाही.

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक : ७/८/१९८९

Ananth

( श्री. मधूकर बाबूराव अनंतकवळस )

संशोधक

## ऋणनिर्देश

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधाला पूर्णत्व देण्यापर्यंत माझ्या आदरणीय व माननीय मार्गदर्शिका डॉ. सौ. व्ही. एम्. कशाळीकर, देवचंद महाविद्यालय अर्जुननगर यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनामुळे स्वत: घेतलेल्या कष्टामुळे, सहकार्यामुळे व वेळोवेळी प्रबंध पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणामुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला त्यांचा सदैव ऋणी राहणे हे मी माझे सद्भाग्यच समजतो.

एम्. फील् अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. एम्. जे. कशाळीकर, देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर, प्राचार्य एल्. टी. जाधव, कला व वाणिज्य महाविद्यालय कुर्डूवाडी व माझे जेष्ठ बंधू यांचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहेत.

तसेच डॉ. व्ही. बी. घुगे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. आर. आर. दोशी, डॉ. जे. एफ्. पाटील. डॉ. टी. जी. नाईक, डॉ. सौ. एस्. बी. पंडीत, प्रा. ए.ए. डांगे व प्रा. आर. जी. दंडगे यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

या अभ्यासासाठी दि. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा कुर्डूवाडी यांचे व्यवस्थापक श्री. भिसे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कार्यालय, माढा यांचे व्यवस्थापक श्री. एस्. एस्. पारसे तसेच भूविकास बँक माढा यांचे व्यवस्थापक एस्. ई. लिंगाडे, लेखनिक एस्. टी. गिड्डे, श्री. पाटील, श्री. काटकर यांनी आपला वेळ खर्च करून अभ्यासासाठी

आवश्यक असणारी सर्व माहिती दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

माझा प्रबंध पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन देणारे माझे मित्र श्री. डुकरे बी. बी. , श्री. पोळ ए. ए. व विद्याधर दाडीबुडे यांचा मी आभारी आहे.

अर्थशास्त्र विभागातील संशोधन सहाय्यक श्री. अशोक साबळे, लेखनिक श्री. मधूकर पाटील व कु. साळुंखे, शिपाई कांबळे या सर्वांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

या प्रबंधाचे काम सुबक व वेळेवर पूर्ण करून देणारे टायपिस्ट श्री. व सौ. चव्हाण आणि प्रबंध पूर्ण करण्यासाठी इतरांनी जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक : १/९/१९८९

Anantk

( श्री. मधूकर बाबूराव अनंतकवळस )

संशोधक

## : अनुक्रमणिका :


| प्रकरण क्रमांक | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रास्ताविक व अभ्यासाची रुपरेषा. | १ – ४ |
| १) | भारतातील सहकारी पतपुरवठा रचनेचे परिक्षण | ५ – ३३ |
| | अ) शेतीला पतपुरवठयाची गरज. | |
| | ब) शेती कर्जाचे वर्गीकरण . | |
| | क) भारतातील शेती कर्ज पुरवठा करणा–या संस्था. | |
| | ड) भारतातील सहकारी पतपुरवठा चळवळ. | |
| | फ) भारतातील सहकारी पतपुरवठा रचना. | |
| | इ) दीर्घ मुदतीचा पतपुरवठा करणारी भू–विकास बँक. | |
| २) | माढा तालुक्याची आर्थिक रुपरेषा. | ३४ – ४२ |
| ३) | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाचे मूल्यमापन. | ४३ – ७४ |
| | विभाग पहिला : माढा तालुका प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था | |
| | विभाग दुसरा : माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी अल्प मुदतीच्या कर्जाचे केलेले वाटप. | |
| | विभाग तिसरा : माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी मध्यम मुदतीच्या कर्जाचे केलेले वाटप. | |
| ४) | माढा तालुक्यातील भू–विकास बँकेची भूमिका. | ७५– ९४ |
| ५) | समारोप. | ९५– १००. |
| | संदर्भसूची. | |

: कोष्टक सूची :


| प्रकरण-क्रमांक | कोष्टक-क्रमांक | शीर्षक | पृष्ट क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | १. | भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था. | १५ |
| | २. | भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची प्रगती. | २३ |
| | ३. | भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची प्रगती. | २५ |
| | ४. | भारतातील राज्य सहकारी बँकांची प्रगती. | २७ |
| | ५. | भारतातील मध्यवर्ती भूविकास बँकांची प्रगती. | ३२ |
| २) | १. | माढा तालुक्यातील जमिनीचा वापर | |
| | २. | माढा तालुक्यातील पिकाचा आकृतीबंध. | ३९ |
| | ३. | माढा तालुक्यातील ओलिता खालील क्षेत्र. | ४१ |
| ३) | १. | माढा तालुका प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था सभासदत्व. व्याप्तखेडी व ग्रामीण लोकसंख्येशी सभासदांचे प्रमाण | ४४ |
| | २. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेच्या सभासदांची जमीन धारणक्षेत्रानुसार व अन्य विभागणी. | ४६ |
| | ३. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी दिलेली एकूण कर्जे. | ४९ |
| | ४. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी दर संस्थेमागे व दर सभासदामागे दिलेली कर्जे. | ५१ |
| | ५. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची पीकवार अल्पमुदत कर्जाची वर्गवारी. | ५५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ६. | माढा तालुक्यातील पीक कर्जाचे घटकानुसार वाटप. | ५९ |
| | ७. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच्या अल्पमुदत कर्जाचे हेतुनुसार वाटप | ५९ |
| | ८. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाचे अल्पमुदतीच्या कर्जाचे धारणक्षेत्रानुसार वाटप. | ६२ |
| | ९. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाचे अल्पमुदत कर्जाचे व कर्ज घेतलेल्या सभासदाचे रकमेनुसार वर्गवारी. | ६४ |
| | १०. | प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच्या मध्यम मुदतीच्या कर्जाचे हेतुनुसार वाटप. - माढा तालुका. | ६६ |
| | ११. | प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या मध्यम मुदत कर्जाची धारणक्षेत्रानुसार वर्गवारी - माढा तालुका. | ६८ |
| | १२. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी मध्यममुदत कर्जाचे रकमेनुसार वर्गवारी. | ७० |
| | १३. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची थकबाकी. | ७२ |
| | १४. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था. | ७४ |
| ४) | १. | माढा तालुक्यातील भूविकास बँकेचे कर्जवाटप. | ७७ |
| | २. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचा मालकी जमिनीच्या प्रकारानुसार कर्जपुरवठा. | ७९ |

| | | |
|---|---|---|
| ३. | माढा तालुका भूविकास बँकेचा उद्देशानुसार कर्जपुरवठा. | ८४ |
| ४. | माढा तालुक्यातील भूविकास बँकेचा कोटा. | ८७ |
| ५. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचे भाग भांडवल. | ८८ |
| ६. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेची सभासद संख्या व दर सभासदामागील कर्ज. | ९० |
| ७. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेची वसूली. | ९१ |
| ८. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेची थकबाकी. | ९३ |

...

## आलेख व नकाशे सूची


| प्रकरण-क्रमांक | आलेख-क्रमांक | शिर्षक | पृष्ठ-क्रमांक |
|---|---|---|---|
| ३) | १. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेच्या सभासदांची विभागणी. | ४७ |
| | २. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी दिलेली एकूण कर्जे. | ५० |
| | ३. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची एकूण सभासद संख्या व कर्जदार सभासद संख्या. | ५२ |
| | ४. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची पीकवार अल्पमुदत कर्जाची वर्गवारी. | ५६ |
| | ५. | माढा तालुक्यातील पीक कर्जाचे घटकानुसार वाटप. | ५८ |
| | ६. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच्या अल्पमुदत कर्जाचे हेतुनुसार वाटप. | ६० |
| | ७. | माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच्या मध्यममुदतीच्या कर्जाचे हेतुनुसार वाटप. | ६७ |
| ४) | ८. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचा कोटा व कर्जवाटप. | ७८ |
| | ९. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचा मालकी जमिनीच्या प्रकारानुसार कर्जपुरवठा. | ८० |
| | १०. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचा उद्देशानुसार कर्जपुरवठा. | ८५ |
| | ११. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचे भाग भांडवल. | |
| | १२. | माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचे कर्जवाटप व थकबाकी. | ९४ |
| | नकाशे : | १) सोलापूर जिल्हा. | ३५ |
| | | २) माढा तालुका. | ३७ |


...

## प्रास्ताविक:

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या शेती-व्यवसायाच्या तंत्रात महत्त्वपूर्ण बदल झाले. शेतीच्या नव्या तंत्रामुळे शेतीसाठी हव्या असणा-या कर्जाची गरजही वाढत गेली. ही वाढती गरज लक्षात घेऊन शेतीक्षेत्राला संस्थापक कर्जपुरवठयाची व्याप्ती वाढविण्याचे प्रयत्न झाले. सहकारी संस्था प्रमाणेच राष्ट्रीयीकृत व्यापारी बँका व क्षेत्रीय ग्रामीण बँका शेतीच्या वाढत्या कर्जाच्या गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी उचलू लागल्या. शेतीकर्जाबाबत बहुसंस्थात्मक धोरण सरकारने स्वीकारले. परंतु त्यामुळे ग्रामीण भागात काम करणा-या सहकारी शेती कर्ज पुरवठा संस्थाचे महत्त्व कमी झाले असे मात्र म्हणता येणार नाही. उलट बदलत्या परिस्थीतीत या संस्थावरची जबाबदारी वाढली. राष्ट्रीयीकृत व क्षेत्रीय ग्रामीण बँकाच्या स्पाने या संस्थाना अप्रत्यक्षरीत्या एक नवे आव्हान निर्माण झाले. हे आव्हान या संस्था कितपत स्वीकारू शकतात याला महत्त्व आले. याच पार्श्वभूमीवर प्रस्तुत अभ्यासासाठी माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची निवड करण्यात आली.

### अभ्यासाची रूपरेषा :

#### अ) समस्येची निवड :

प्रस्तुत अभ्यासाचे शीर्षक "शेती विकासासाठी सहकारी पतपुरवठा माढा तालुक्याचा (जि. सोलापूर) अभ्यास" असे आहे. भारतात सहकारी शेती पतपुरवठयाचे अनेक अभ्यास झाले आहेत. व या विषयावरचे अभ्यास सातत्याने सुरूही आहेत. प्राथमिक सहकारी शेती पतपुरवठा संस्था या ग्रामीण पातळीवर शेतीला कर्जपुरवठा करणा-या सर्वात जुन्या संस्था आहेत. त्यामुळे या संस्थाचे सतत मूल्यमापन होऊन त्यांच्या कार्यपध्दतीतील उणीवा अथवा दोष जाणून घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासासाठी या संस्थाची निवड करण्यात आली. या संस्था शेतीच्या वाढत्या कर्जाच्या गरजा भागवित आहेत का ? सीमांत व लहान शेतक-याना या संस्थाच्यामुळे कितपत फायदा होतो आहे ? या संस्थाची आर्थिक ताकद वाढली आहे का ? असे अनेक प्रश्न महत्त्वपूर्ण वाटल्याने संशोधकाने या संस्थाचा अभ्यास करण्याचे ठरविले.

ब) समस्येची मांडणी:

या संस्थाचा अभ्यास कोणत्या दृष्टीने केला आहे हे ही या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. "शेतीच्या विकासासाठी सहकारी पतपुरवठा माढा तालुक्याचा (जि. सोलापूर) अभ्यास" असे या अभ्यासाचे शीर्षक आहे. परंतु शेतीचा विकास हा कोणत्याही एका घटकावर अवलंबून नसून अनेक घटकावर अवलंबून असतो. नियमित पाणीपुरवठा, खते, बियाणे, जंतुनाशके व जमिनीचा दर्जा हे सर्व घटक शेतीच्या विकासावर परिणाम करतात. यापैकी कोणत्याही एका घटकाचा व शेती विकासाचा सहसंबंध मोजणे अवघड असते. यामुळे हा अभ्यास करत असताना शेतीच्या विकासासाठी आवश्यक असणारा एक घटक म्हणजे कर्जपुरवठा करण्यात माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी कशा प्रकारची कामगिरी केली आहे, एवढयाचाच विचार केलेला आहे. त्यानी केलेल्या कर्जपुरवठयामुळे शेतीचे उत्पादन वाढले, की नाही अशा पध्दतीने या संस्थांचा अभ्यास केलेला नाही. त्यानी केलेल्या कर्जव्यवहाराचे सर्वसाधारण विश्लेषण एवढेच अभ्यासाचे स्वरूप आहे.

क) अभ्यासाचा कालावधी:

माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची स्थापना १९२२ मध्ये झाली तर प्राथमिक भूविकास बँकेची स्थापना १९५५ मध्ये झाली आहे. परंतु या अभ्यासासाठी १९८३-८४ ते १९८७-८८ हा ५ वर्षाचा कालावधी निवडला आहे. या कालावधीतील अभ्यासामुळे शेतीसाठी मिळालेल्या पतपुरवठयातील अलीकडील बदल समजू शकतील असे वाटल्याने या कालावधीची निवड करण्यात आली आहे.

ड) अभ्यासाची उद्दिष्टे :

१) माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी दिलेल्या अल्पमुदत व मध्यममुदत कर्जाचा अभ्यास करणे.

२) या संस्थाच्या एकंदर प्रगतीचा धावता आढावा घेणे.

३) प्राथमिक भूविकास बँकानी दिलेल्या शेतीकर्जाचा अभ्यास करणे.

इ) <u>तथ्य संकलन</u>:

तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम सामुग्रीचा वापर केलेला आहे. दुय्यम सामुग्री म्हणून प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेच्या माहितीसाठी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय माढा याचे वार्षिक अहवाल व भूविकास बँकेच्या कार्यालयीन दप्तरांच्या आधारे माहिती मिळविलेली आहे. जेथे दुय्यम माहिती अपुरी वाटली येथे प्रत्यक्ष माहिती मिळविण्यात आलेली आहे.

फ) <u>अभ्यासाचा आराखडा</u>:

प्रस्तावनेत शेती विकासाच्या धोरणात्मक भाग म्हणून भारतात शेतीला पतपुरवठयाची गरज आहे. अशा पार्श्वभूमीवर अभ्यासाची रूपरेषा स्पष्ट केली आहे.

पहिल्या प्रकरणात भारतातील शेती सहकारी पतसंस्थाच्या विकासाचा व रचनेचा आढावा घेतला आहे.

माढा तालुक्याची आर्थिक रूपरेषा प्रकरण दोनमध्ये मांडली आहे.

तिस-या प्रकरणात माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाचे विश्लेषण केले आहे हे विश्लेषण –

भाग – १ : माढा तालुका प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था.

भाग – २ : माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी अल्प मुदतीच्या कर्जाचे केलेले वाटप.

भाग – ३ : माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी मध्यम मुदतीच्या कर्जाचे केलेले वाटप.

अशा तीन भागात केले आहे.

चौथ्या प्रकरणात माढा तालुक्यातील प्राथमिक भूविकास बँकानी दिलेल्या शेती कर्जाचा अभ्यास केला आहे.

पाचव्या प्रकरणात अभ्यासाच्या आधारे कांही निष्कर्ष काढलेले आहेत.

...